माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२१/अपील/०५/२०२१/३३० दिनांक-२७.०७.२०२१

माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक :१९.०५.२०२१
जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक:०७.०७.२०२१
प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक :०२.०७.२०२१
प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक :२७.०७.२०२१

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०५/२०२१**

**अपीलकर्ता:** श्री. जगनसिंह राजपूत

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपीलाचे तथ्य :-**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक १२.०५.२०२१ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक १९.०५.२०२१ रोजी प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या दिनांक १२.०५.२०२१ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक ०२.०७.२०२१ रोजी वरील अपील दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०२.०७.२०२१ रोजी प्राप्त झाले)

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक ०५.०७.२०२१ रोजी नोटिस पाठवून दिनांक १९.०७.२०२१ रोजी सुनावणी आयोजीत केली. अपिलार्थी यांनी दिनांक १४.०७.२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांना ई-मेल द्वारे 'व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे' सुनावणी घेण्याची विनंती केली त्यानुसार 'व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे' सुनावणी घेण्यात आली. सुनावणी च्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in **Website :** www.merc.gov.in

होते. अपिलार्थी व माहिती अधिकारी यांनी मौखिक निवेदन सादर केले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक २२.०७.२०२१ रोजी चे लेखी निवदेन सादर केले.

### ३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -

**<u>मागितलेली माहिती:-</u>**

१) आपल्या राज्यामध्ये विद्युत लोकपाल २००५ पासून आजपावेतो कोण होते व त्यांना कोणत्या आधारे नियुक्त करण्यात आल्याची लिस्ट आजपावेतो मिळावी.

२) आपल्या विज नियामक आयोगाच्या कोणत्या नियमामध्ये १ न्यायाधिश (विद्युत लोकपाल) २ न्यायव्यवस्थेचे कार्य पाहू शकते त्याचा जिआरची स्वाक्षरी प्रत मिळावी.

३) आपल्या विज नियामक आयोगाच्या नियमामध्ये २००५ पासून १ न्यायाधिश (विद्युत लोकपाल) दोन न्यायव्यवस्थेचे कार्य पाहत आहे त्याची २००५ पासून आजपावेतो नावासह लिस्ट स्वाक्षरी मिळावी.

४) आपल्या विज नियमक आयोगाच्या नियमाप्रमाणे कोणत्याही न्यायव्यस्थेचे पद ३ महिना अतिरिक्त रिक्त ठेण्यात येऊ नये असा नियम असतांना आपल्या विद्युत लोकपाल व ग्राहक तक्रार मंच झोनचे ३ महिन्यापेक्षा जास्त रिक्त ठेवल्यास जबाबदारी विज वितरण कंपनीची राहिल की विज नियामक आयोगाची त्याची जिआरची प्रत स्वाक्षरी मिळावी.

**<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>**

जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविलेली नाही / उत्तर दिलेले नाही असे अपीलात नमुद केलेले आहे. तथापी, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७.०७.२०२१ रोजी माहिती उपलब्ध करून दिल्याचे म्हटले आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपील प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रलंबित असताना उपलब्ध करुन दिली आहे.

**<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>**

माहिती मिळाली नाही.

**<u>अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-</u>**

अपीलार्थी व प्रतिवादी यांनी नमूद केलेल्या मौखिक निवेदनावरून तसेच अपीलातील मुद्द्यावरून असे दिसून येते कि, अपीलार्थी यांना त्यांच्या माहिती अधिकार अर्जाच्या अन्वये माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

दिनांक १९.०७.२०२१ रोजीच्या सुनावणी दरम्यान अपीलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाल्याचे सांगीतले तथापी, ती माहिती अपूर्ण आहे असे नमुद केले.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती उशीराने उपलब्ध करून दिल्याचे कारण नमुद करून अर्ज निकाली काढला आहे. परंतु, त्यापुर्वी अर्जदार/अपीलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले होते, व सदर अपील प्रलंबीत होते.

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांचे निवेदन विचारात घेवून सदरहू अपील निकाली काढण्यात येत आहे ते येणे प्रमाणे :-

१) अपीलार्थी यांनी माहिती अर्जात मागीतलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरूपाची आहे व अपीलार्थी यांनी त्यांना पाहिजे असलेल्या दस्तऐवजांची ठळक माहिती नमुद केलेली नसून प्रश्नरूपी माहिती मागीतल्याचे दिसून येत आहे. करीता, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली माहिती योग्य असून त्यात हस्तक्षेप करण्याची गरज नाही.

२) अपील प्रलंबीत असताना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७.०७.२०२१ रोजी माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

३) जन माहिती अधिकारी यांनी या नंतर अपील प्रलंबीत असताना कोणतेही माहिती अधिकाराचे अर्ज निकाली काढू नये अशी ताकीद देण्यात येत आहे.

४) अपीलीय अधिकारी यांना असे निदर्शनास आलेले आहे की, माहिती अधिकार या अर्जामध्ये काय कार्यवाही केल्याचे/व तक्रारवजा अर्ज आहे असे दिसून येते. करिता माहिती अधिकारी यांच्याकडून या विषयी स्वत: उत्तरे देणे अपेक्षित नाही तर, कार्यालयात उपलब्ध असलेले दस्ताऐवज, इत्यादी उपलब्ध करून देणे आहे, करिता माहिती अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्याची गरज नसल्याचे दिसून येते.

वरिल कारण मिमांसेवरून सदर अपील खारिज करण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

अपील खारीज करण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत,
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८,
रूम नं. ४, उल्हासनगर-१,
जि. ठाणे - ४२१००१
मो.नं.९८६०१९७८०८

**(अनिलकुमार उके)**

**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**